# वसंतराव नाईक शेतीमित्र २०१२

## श्री. राहूल मनोहर खैरनार

### जय अंबिका कॉलनी, मालेगाव कॅम्प, ता. मालेगाव, जि.नाशिक



३९

- कसमादे मुक्त कृषी विज्ञान मंडळाचे अध्यक्ष असून मंडळाचे माध्यमातून सेंद्रिय शेती व एकात्मिक पीक व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार.
- रंगीत मार्गदर्शक पुस्तिका शेतकरी बांधवांना वाजवी दरात उपलब्ध करुन देऊन स्वत: प्रकाशित केलेली ४० प्रकाशने व १२०० इतर कृषि विषयक माहिती पुस्तिकांचे प्रकाशन.
- कृषि विषयक माहितीच्या ऑडीओ- व्हीडीओ सीडीजची निर्मिती.
- एकात्मिक कीड व्यवस्थापनाचे महत्त्व शेतक-यांना पटवून देण्याकरीता शिवार फेरी, प्रक्षेत्र भेटी व चर्चासत्र इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन.
- परिसरातील ५००० शेतक-यांना माती व पाणी परीक्षण सेवा माफक दरात उपलब्ध.
- जैविक किटकनाशके व जैविक खते यांचा शेतक-यांनी जास्तीत जास्त वापर करण्याकरीता जनजागृती.

# वसंतराव नाईक शेतीमित्र २०१२

## श्री.जितेंद्र रघुनाथ पाटील

### मु.पो. ममुराबाद, ता. जि. जळगाव



- कृषि पत्रकार म्हणून कार्यरत असून पत्रकारीतेबरोबरच स्वतःची शेती.
- सकाळ वृत्तपत्र आणि साम टि.व्ही. वरील ॲग्रोवन कार्यक्रमाच्या माध्यमातून कृषि विभागाच्या विविध योजनांचा सातत्याने प्रसार.
- आत्मा योजनेच्या माध्यमातून ममुराबाद (ता.जळगाव) येथील युवा शेतक-यांना एकत्र आणुन कृषि बचत गटाची स्थापना.
- पशुसंवर्धन विभागाचे मदतीने ॲझोला युनिटची उभारणी करुन त्याचा पशुखाद्यात वापर.
- पत्रकारीतेच्या माध्यमातून कृत्रिम जल पुनर्भरण, जल व मृदसंधारणाची कामे त्याचप्रमाणे केळी, तूर, सोयाबीन इत्यादींच्या संदर्भात विविध शेतक-यांच्या यशोगाथांचे प्रसारण.
- पर्यावरण वाचविण्यासाठी पत्रकारीतेतुन सातपुडा बचाव अभियानात सक्रीय सहभाग.

४०

# वसंतराव नाईक शेतीमित्र २०१२

## ॲड. श्री. बाळासाहेब जगन्नाथ बोठे पाटील

मु.पो. जिद्द बंगला, देना बँक कॉलनी, प्रेमदान चौकाजवळ, सावेडी रोड, अहमदनगर



४१

- शेतक-यांच्या शेतावर प्रत्यक्ष जाऊन शेतक-यांच्या अडीअडचणी समजावून घेऊन ते बातमी स्वरुपात जनतेसमोर मांडण्याचे मोठे काम प्रकर्षाने सुरु.
- इतर शेतक-यांना प्रेरणा मिळावी म्हणून शेतक-यांच्या यशोगाथांना प्रसिध्दी.
- पारंपारीक शेती, आधुनिक शेती, शेतक-यांचे जीवन, विद्यापीठातील संशोधन, शेतीमधील नवीन तंत्रज्ञान, ठिबक व तुषार सिंचन, शेडनेट, पॉली हाऊस व टिश्यू कल्चर इत्यादी कृषि विषयक लेखनाच्या माध्यमातून जिल्हयातील शेतक-यांना आधुनिक शेतीकडे वळविण्याचे मोठे काम.
- महिलांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या अडीअडचणी समजावून घेवून बचत गटांच्या उत्पादनांची प्रदर्शने, धान्य व फळे महोत्सव, आत्मा अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण, तनिष्का व्यासपीठ, मधुरांगण इत्यादी माध्यमातून शेतीबाबतची माहिती महिलांपर्यंत पोहोचविण्याचे काम.
- शेती क्षेत्रातील योगदानाबद्दल राज्य आणि जिल्हास्तरावर विविध पुरस्कारांनी गौरवित.

# वसंतराव नाईक शेतीमित्र २०१२

## श्री. रावसाहेब बाळू पुजारी

### मु.पो. तमदलगे, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर



४२

- शेतीविषयक विविध पुस्तके प्रकाशित झालेली असून शेती प्रगती हे कोल्हापूर येथून प्रकाशित होणारे लोकप्रिय मासिक.
- दैनिक सकाळ मध्ये १६ वर्षे कृषि पुरवणीचे संपादन, शेतीविषयक ३ पुस्तकांचे प्रकाशन व विविध नियतकालिकांमध्ये १५०० पेक्षा अधिक लेख प्रसिध्द.
- युवा सकाळमधून तरुण शेतक-यांच्या प्रयोगावर आधारीत “रानवारा”, पाणीप्रश्न जागृत करणारे “जागर पाण्याचा” आणि “समस्या क्षार पिडीत जमिनीच्या” या विशेष गाजलेल्या लेखमाला.
- सेंटर फॉर सायन्स ॲन्ड एन्व्हॉयरमेंट (सीएसई) नवी दिल्ली या संस्थेची प्रतिष्ठित मानली जाणारी फेलोशिप प्राप्त. “महाराष्ट्रातील क्षारपिडीत जमिनीची समस्या” हा विषय अभ्यासून विशेष लेखन.
- नाबार्ड पुरस्कृत शेतकरी मंडळाचे अध्यक्ष तर साहित्य सुधामंच या संस्थेचे उपाध्यक्ष असून या संस्थेमार्फत गेली १५ वर्षे साहित्य संमेलन भरविण्यात सक्रीय सहभाग.
- जिल्हा परिषद कोल्हापूर, आरसीएफ मुंबई तसेच वसंतराव प्रतिष्ठान मुंबई यांच्या तर्फे विशेष गौरव.

# वसंतराव नाईक शेतीमित्र २०१२

## श्री. अतुल अविनाश कुलकर्णी

### मु.पो.विडा, ता. केज, जि. बीड



- बीड जिल्हयातील प्रगतशील शेतकरी असून २.८५ हेक्टर जमीन.
- महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रात पत्रकार म्हणून गेली १५ वर्षे कार्यरत.
- ई. टी.व्ही मराठी वृत्तवाहिनीचे जिल्हा प्रतिनिधी म्हणून १० वर्षे बीड येथे कार्यकाल.
- महाराष्ट्र टाईम्स मधून कृषि विभागाच्या विविध योजना शेतक-यांपर्यत पोहचविण्याचे काम.
- लोकछत्र या दिवाळी अंकाच्या माध्यमातून कृषिविषयक अनेक सदरे चालवून मान्यवरांचे कृषि विषयक लेख, मुलाखती व परिसंवाद या अंकात प्रसिध्द करण्याचे काम.
- दुष्काळासंदर्भात विशेष अंक काढून दुष्काळामागील कारणमिमांसा जलसंवर्धन क्षेत्रात काम करणा-या मान्यवरांकडून मांडून दुष्काळाच्या निराकारणासंदर्भात त्यांचे मार्गदर्शन लेखांच्या माध्यमातून या अंकात प्रसिध्द.

४३